मंगळवार दि.६ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३३८
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# शिंदे यांची शिवसेनाच खरी शिवसेना मानतो आंबेडकर यांच्या वक्तव्याने राजकीय चर्चा

## खरा शिवसैनिक शिंदेंसोबतच असल्याचा दावा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

उद्धव ठाकरे यांच्या स्ट्राईक रेट हा आरक्षणावादी आणि मुस्लिम यांच्यामुळे वाढला असल्याचा दावा वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांना मिळालेल्या मतांचा अभ्यास केला तर एकनाथ शिंदे यांचा स्ट्राईकरेट सरळ सरळ डबल असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे मी त्यांचीच खरी शिवसेना असल्याचे मानत असल्याचे देखील प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानामुळे आता राजकीय वर्तुळात चांगली चर्चा रंगली आहे. शिवसेनेला जी मत मिळत होती ती शिवसेनेची सर्व मत एकनाथ शिंदे यांच्याकडे राहिली आहेत. आणि खरा शिवसैनिका एकनाथ शिंदे यांनाच खरी शिवसेना मानतो आहे. दुसरीकडे उद्धव ठाकरे यांचा जो स्ट्राइकरेट आलेला आहे, तो आरक्षणवादी आणि मुस्लिम यांच्यामुळे वाढला आहे. त्यामुळे तो धर्मवादी पक्षांचा मतदार नसल्याचा दावा देखील प्रकाश आंबेडकर यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केला आहे. त्यामुळे मी देखील एकनाथ शिंदे यांची शिवसेनाच खरी शिवसेना मानत असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.राज ठाकरे यांच्यावर डाटा कायद्यानुसार कारवाई करायला हवी, अशी मागणी देखील प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. मराठा आणि ओबीसी आरक्षणावरील भूमिकेवर राज ठाकरे यांनी टीका केली होती. महाराष्ट्रात सर्व गोष्टी मुबलक प्रमाणात आहेत. त्यामुळे मुळातच महाराष्ट्राला आरक्षणाची गरज नसल्याचे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी म्हटले होते. तसेच परप्रांतीय समाजावरच महाराष्ट्रातील सर्व पैसा खर्च होत असल्याचे देखील राज ठाकरे यांनी म्हटले होते. त्यांच्या या टीकेला प्रकाश आंबेडकर यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

# उमरज येथे ग्रामसभा संपन्न; ४० लक्ष रुपयांच्या कामाला सुरुवात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे



ग्रामसभा ही गावांतील विकासाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठीचे एक उपयुक्त व्यासपीठ असते,गावातील विविध विकासाच्या प्रश्नांवर चर्चा करून गावांचा विकास कसा साधता येईल हा ग्रामसभेचा उद्देश असतो. १ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत कार्यालय उमरज येथे ग्रामसभा पार पडली.

श्री गुरु एकनाथ नामदेव महाराजांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते.गुरुवर्य एकनाथ नामदेव महाराज,सरपंच जयश्री केंद्रे, उपसरपंच गणपती राठोड यांच्या हस्ते साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

ग्रामसभे मध्ये जिल्हा परिषद शाळेतील स्वच्छता करणे,दुरुस्ती करणे,शाळेतील मुलांना पाणी फिल्टरची व्यवस्था, दलित वस्तीसाठी ९ लक्षाचा सी.सी. रोड,पेवर ब्लॉकचे काम,पळसवाडी येथे ५ लक्ष रु. पेवर ब्लॉकचे काम, गावांत ४० लक्ष रु.निधी मंजूर असल्याने ग्रामसभेत ग्रामस्थासमोर ठरावाचे वाचन करुन ठराव पारीत करण्यात आला व प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली आहे. कृषी विभागातर्फे डी.ए.पी. नॅनो गोणी २८० शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य ज्येष्ठ नागरिक, महिला, तरुण मंडळी, ग्रामसेवक, तलाठी, कृषी विभागातील कर्मचारी आरोग्य विभागातील कर्मचारी,कोतवाल आदी उपस्थित होते.

# ओबीसी बांधवांनी आरक्षण बचाव यात्रे मध्ये हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार । विनायक कुटे



मंगळवार दिनांक ६ ऑगस्ट रोजी ओबीसी आरक्षण बचाव रथयात्रा श्रद्धे बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात बुलढाणा जिल्ह्यामध्ये प्रवेश करीत आहे बाळासाहेब आंबेडकरांनी दिनांक २५ जुलै रोजी चैत्यभूमी मुंबई येथून ओबीसी आरक्षण बचाव रथयात्रेला आरंभ केलेला आहे सदर रथयात्रेचे उद्दिष्टे ही एससी एसटी आणि ओबीसी यांची शिष्यवृत्ती हे दुप्पट करण्यात यावी एससी एसटी आणि ओबीसी यांना नोकरीमध्ये पदोन्नतीसाठी आरक्षण देण्यात यावे तसेच ज्याप्रमाणे एससी एसटीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते त्याच धर्तीवर ओबीसीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात यावी या प्रमुख मागण्या घेऊन वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांनी ओबीसी आरक्षण बचाव यात्रा महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यामधून काढले आहे उद्या दिनांक ६ ऑगस्ट रोजी ओबीसी आरक्षण बचाव रथयात्रा बुलढाण्यातील डोणगाव येथे सकाळी साडेनऊ वाजता आगमन करीत आहे त्या ठिकाणी साहेबांचा सत्कार केल्यानंतर ठीक साडेदहा वाजता मेहकर येथील नगरपालिकेच्या स्वतंत्र मैदानावर त्यांचे जाहीर सभा आयोजित केली आहे तरी सर्व ओबीसी बांधवांना आणि बहुजन समाज बांधवांना वंचित बहुजन आघाडीचे ज्येष्ठ नेते भाई महेंद्र पनाड वंचित बहुजन आघाडीचे लोणार तालुका अध्यक्ष दिलीप भाऊ राठोड युवा आघाडीचे अध्यक्ष गौतम भाई गवई युवा महासचिव पवन भाऊ अवसरमोल महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष मालतीताई कळंबे यांनी आवाहन केले आहे यासंदर्भात नुकतेच शासकीय विश्रामगृह लोणार येथे तालुक्यातील महत्त्वपूर्ण घटकांना सोबत घेऊन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीमध्ये श्याम राऊत पांडुरंग दादा सुरूसे रामू मुंडे चाटे साहेब रमेश आंधळे सचिन कापुरे गजानन घुले उमेश राठोड महादेव घुले यांच्यासह शिवप्रसाद वाठोरे रमेश प्रधान श्याम कटारे रामेश्वर जावळे प्रवीण कळंबे समाधान डोके मंगेश सरदार संतोष अंभोरे अमोल बशिरे संजय नेवरे रोहिदास बशिरे आदी उपस्थित होते

# लोहा न.पा.चे आस्थापना प्रमुख नंदकुमार अंकले सेवानिवृत्त



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोहा । विशाल घंटे

लोहा न.पा.चे आस्थापना प्रमुख नंदकुमार अंकले हे लोहा न.पा.त ३३ वर्षं प्रदिर्घकाळ सेवा करून नियत वयोमानानुसार दि.३१ जुलै २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले.

त्यांच्या या सेवानिवृत्तीबदल त्यांचा लोहा न.पा. चे लोकनियुक्त मा.नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांनी नंदकुमार अंकले यांचा सपत्नीक लोहा शहरांच्या परंपरेनुसार खारिक खोबऱ्याचा हार घालून शाल पांघरून टोपी घालून भव्य सत्कार करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.यावेळी मा. नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी, मा.नगरसेवक संदिप दमकोंडवार, जेष्ठ नागरिक गंगाधरराव महाबळे, लोहा न.पा.चे कार्यालयीन अधीक्षक उल्हास राठोड, युवा नेते सचिन सावकार सुर्यवंशी,संजय चव्हाण, गंगाधर भिसे ,विनय चंदेवाड यांच्यासहित मित्रपरिवार उपस्थित होता.

# शिव महाकाल भक्तांचे श्रद्धा स्थान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

दानापूर । राम शिंदे





दानापुर येथील जागृत असे महादेव मंदिर खुप पुरातन असुन भक्तांचे श्रद्धा स्थान असुन भक्तांच्या मनोकामना पुर्ण करणारे दैवत आहे. श्रावण महिना हा गांवातील व बाहेर गांवी गेलेल्या भक्तांना खास प्रवणी ठरतो.१९६१पासुन शिवस्वरूप रामराव महाराज शेळके हे भोले शंकरचे निसीम असे भक्त होते त्यांनी२००१ला मंदिराचा जिर्णोद्धार केला त्यांची आताच दोन दिवसा पुर्वी द्वितीय पुण्यस्मरण झाले असुन भाविक भक्तांना त्यांची कमी हि भासतच राहणार आहे.त्यांचे वंशज शिवभक्तीचा वारसा पुढे चालवत असुन या श्रावण प्रवणीस रूद्र अभिषेक ,लघु रूद्र अभिषेक,नित्यपुजा,आरती नगरवासिय शिवभक्त मंडळी सकाळ -संध्याकाळ नित्यनियमाने करता.सोमवारी लहान थोर शिवभक्त मंडळी बेल, फुल,पुजेचे साहित्य घेऊन ओम नमःशिवाय नामाचा गजर करत परिसर भक्तीमय करून टाकतात. ७१ वर्षांनी योग आलेला आहे की आज सोमवार पासुन श्रावण सोमवार सुरू होत आहे आणि विराम सुद्धा सोमवार लाच येतो म्हणुन उच्चत्तम कोटी असलेली सेवा सर्व शिवभक्तांनी रूजु करून उममहेश्वर भोले भंडारी, अर्धनारी नटेश्वर,गौरिपती, चंद्रमौळी देवाधीदेवांचा महादेव महाविराट रूपात भगवान शिवची स्तुती गायली आहे.शिव भगवंताच्या कृपा शिवाय कोणतेही अध्यात्म साधना फलद्रुप होत नाही, भगवान शिवशंकर ज्ञान,वैराग्य, योग,साधना, भक्ती, आगम, मंत्र, तंत्र, यंत्र, नृत्य, नाट्य, वाद्य, संगीत, व्याकरण, इ.समस्त कला व विद्यांचे गुरू आहे.नव्हे शिव भगवान गुरूत्त्वाचे रहस्य आहे,श्रीमद् भागवत महापुराणांत चौथ्या स्कंधात दक्ष यज्ञात सतीच्या आत्मदहनाचा जो प्रसंग वर्णिला आहे.त्यात श्री शिवास जदगुरू संबोधले आहे.संत तुलसीदासांनी रामचरतमानस मध्ये वंदे बोथमयं नित्यं गुरूं शंकर रूपिणम् ।यमाश्रितो हि वक्रोपि चंद्रःसर्वत्र वंद्यते ।। अशी श्री गुरुची वंदना करतांना लिहिले आहे.भक्तांना पावनारेअशा हरीहर परम कृपाळु देवाधिदेव महादेवाचे शिवालय हे दानापुर वासियांना लाभले आहे.

## ओबीसी आरक्षणाला १००% धोका, प्रकाश आंबेडकर

**मुंबई**–कुणबी–मराठा हे खरे ओबीसी नाहीत. कुणबी मराठ्यांपासून सावध राहा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे. यवतमाळच्या पुसदमध्ये त्यांनी नागरिकांशी संवाद साधला आहे. सध्या राज्यभरात त्यांनी ओबीसी आरक्षण बचाव यात्रा सुरू आहे. त्यामुळे ते सातत्याने याबाबत भाष्य करत असल्याचे पाहायला मिळत आहे. दरम्यान, त्यांनी नुकतेच केलेल्या या विधानाची सध्या चर्चा सुरू आहे.

## चारोळी

अपेक्षाचे गाठोडं
कुठेपर्यत वाहणार
जगणं राहुनी गेल्यावर
स्वतःला कशात पाहणार.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# इंजि.तानाजी जंजिरे यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के




यशस्वी उद्योजक आणि समाजसेवेचे वृत्त घेऊन समाजासाठी योग्य दिशा दाखवत असलेले मराठा सेवा संघाचे नेते इंजि.तानाजी(बापू) जंजिरे यांचा वाढदिवस आष्टी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.आष्टी येथील राजमाता जिजाऊ वस्तीगृहाततील सभागृहामध्ये केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला.यावेळी त्यांच्यावर अक्षरशः शुभेच्छांचा वर्षाव झाला.

या वाढदिवसानिमित्त उद्योजक दिनेश अण्णा पोकळे यांनी दिलेल्या शुभेच्छा मध्ये म्हटले आहे की, आदरणीय जंजिरे बापू मराठ्यांना योग्य दिशा दाखवण्याचे काम करीत आहेत.त्यांना मराठ्यांची थिंक टँक म्हणून ओळखले जाते.आष्टी तालुक्यातील कुंबेफळ या गावातील एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला त्यांनी त्या काळात पुणे येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून अभियांत्रिकीची पदवी विशेष प्राविण्यासह प्राप्त केली.व पुणे येथेच यशस्वी उद्योजक म्हणून नावारूपाला आले.आता वयाची एकसष्ठी नंतर आपला व्यवसाय आपल्या मुलाकडे सोपवून उर्वरित आयुष्यात समाजकार्य करायचे.असा त्यांचा मनोदय आहे.समाजापुढे जाऊन व समाजासाठी काहीतरी करायचे तळमळ असलेले मराठा समाजातील आष्टी तालुक्यातील ज्येष्ठ समाजसेवक म्हणून त्यांची ओळख आहे.सुमारे एक वर्षांपूर्वी आष्टी तालुका मराठा सेवा संघाची जबाबदारी स्वीकारल्यापासून राजमाता जिजाऊ विद्यार्थी वस्तीगृह व जिजाऊ मंगल कार्यालयाचे रेंगाळलेले काम त्यांनी धडाडीने पुढाकार घेऊन पूर्ण केले आहे. लवकरच या वस्तीगृहाचे व मंगल कार्यालयाचे लोकार्पण कार्यक्रम होणार असल्याचे समजते.मराठा सेवा संघ,जिजाऊ ब्रिगेड,संभाजी ब्रिगेड व इतर सर्व कक्षांच्या शाखा सुरू करून मराठा सेवा संघाच्या कार्याचा झपाटा वाढवणारे बापू म्हणजे समाजाला लाभलेला हिरा आहे. असे दिनेश पोकळे सर यांनी आपल्या शुभेच्छा मध्ये म्हटले आहे .

त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी शिवश्री गंगाधर बनबरे,प्राचार्य शशिकांत कन्हेरे, सुवर्णा गिन्हे,महेंद्र मोरे, ड.निर्मलाताई सोनवणे,प्रा. बाबासाहेब मुटकुळे,प्रा.दत्ता नरसाळे,मुकुंद लगड सर,प्रा. सखाराम वांढरे,अनिता निंभोरे, ड.सीताराम पोकळे, पत्रकार अविषांत कुमकर,पत्रकार संदीप घोडके, प्रा.आप्पाराव टाळके इंजि.प्रल्हाद तळेकर,भास्कर निंबाळकर,आबासाहेब खिलारे, प्रशांत धस,विद्या चव्हाण,वर्षा शिंदे,माधुरी तवले,महेंद्र मोरे, महेश सावंत,सचिन सव्वाशे, राहुल सुरवसे,तुकाराम नावडकर अण्णासाहेब सोळुंके,अविशांत जगताप आदी कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने

# शेतीनिष्ट शेतकरी बबन दादा शिंदे यांच्या ड्रॅगन फ्रुट शेतीला तालुका कृषी अधिकारी यांनी दिली भेट



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

चिखली येथे जागृत देवस्थान महालक्ष्मी यात्रेनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समाजसेवक बबन दादा शिंदे यांच्या राजे संभाजी उद्योग समूहाचे भोजनदानाचा मोठा कार्यक्रम संपन्न झाला.यानिमित्ताने आष्टी तालुक्यातील चिखली येथील शेतीनिष्ट शेतकरी 'समाजसेवक' बबन दादा शिंदे यांच्या ड्रॅगन फ्रुट शेतीला तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी भेट देऊन फळबागेची पाहणी केली यावेळी युवा नेते राधेश्याम भैय्या धस,राजे संभाजी उद्योग समूहाचे संचालक अमोल राजे शिंदे,महेश हंबर्डे यांच्या आदि विविध क्षेत्रातील मान्यवर,शेतकरी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# केवळ बुकलेट वाचून आ.आजबे यांनी सबस्टेशन्स आणि ट्रान्सफर मंजुरी बाबत जनतेची दिशाभूल केली

## अद्याप केंद्र शासनाची मान्यता नाही,जनतेची माफी मागा–माजी राज्यमंत्री सुरेश धस यांचा पलटवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील विजेचा प्रश्न मार्गी लागला ९ सब स्टेशन्स आणि ६६८ ट्रांसफार्मर मंजूर केल्याचा आव आ.बाळासाहेब आजबे यांनी आणला ही जनतेची शुद्ध फसवणूक आणि दिशाभूल असून आपण कार्यकारी अभियंता आणि अधीक्षक अभियंता यांचेकडे प्रस्ताव सादर केला आहे त्याचे पत्र दि. ११नोव्हेबर २०२३ रोजी दिलेले आहे आणि त्याचा पाठपुरावा केलेला आहे मात्र जी योजना अद्याप केंद्र शासनाने मंजूर केलेली नाही केवळ त्याचे बुकलेट मधील नावे वाचून मंजुरीच्या बातम्या दिल्यामुळे मला त्यांच्या बुद्धीची किंवा येते त्यांनी जनतेचे माफी मागावी असा पलटवार माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी पत्रकार परिषदेमध्ये केला याबाबत पुढे बोलताना ते म्हणाले ,दि.२ ऑगस्ट २०२४ रोजी आष्टी मतदार संघाचे आमदारांनी ९ वीज सबस्टेशन्स आणि ६६८ ट्रान्सफॉर्मर्स मंजूर करून विजेचा प्रश्न सोडवला अशा बातम्या आणि वर्तमानपत्रात जाहिराती देऊन आणि सोशल मीडियावर बातम्या पसरवून सत्कार करून घेऊन स्वतःची बडवून घेतली आहे.

हे सर्व पाहता मला त्यांच्या बुद्धीची कीव येते.. हे म्हणजे उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिंग अशी त्यांची अवस्था झाल्याची दिसून येते आष्टी पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील विजेचा गंभीर प्रश्न पाहता आपण सुधारित वितरण क्षेत्र योजना (आर डी एस एस ) अंतर्गत या सर्व कामांना मंजुरी मिळावी यासाठी आपण प्रस्ताव दाखल करून त्यासाठी पत्र दिलेले आहे यामध्ये काही कच्चा आराखडा होता त्यामध्ये काही बदल आवश्यक होते.दादेगाव, पारोडी,बीडसांगवी,मातकुळी, कोयाळ, जामगाव, अंभोरा, पाटोदा तालुक्यातील धनगर जवळका, पारगाव



घुमरा सौताडा,शिरूर कासार तालुक्यातील शिरूर कासार इतकेच नक्की होतील एवढे मी सुचवले होते त्यापैकी दादेगाव हे पूर्वीच्याच महावितरण योजनेत मंजूर होते मात्र जागे अभावी ते राहिले होते पारगाव घुमरा या ठिकाणच्या शेतकऱ्यांना सन २०१४ सालीच भूसंपादनाचे पैसे दिलेले आहेत या ९ वीज उपकेंद्रांचा प्रस्ताव पुढे पाठवला तसेच सद्यस्थितीमध्ये ५ एम व्ही ए क्षमतेच्या पावर ट्रांसफार्मर सह आणखी ५ ट्रांसफार्मर आष्टी, पोखरी,शिराळ,धानोरा, दौलावडगाव,टाकळी अमिया पाटोदा तालुक्यातील रोहतवाडी आणि शिरूर तालुक्यासाठी फिडरवे तयार करणे यासह सद्यस्थितीत१७५ ठिकाणी ६३ क्षमतेच्या ऐवजी १०० क्षमतेचे ट्रांसफार्मर बसवणे ३३/११ सब स्टेशन साठी एकूण ३८ किलोमीटर वीज वाहिनी तयार करणे,या कामांसाठी कार्यकारी अभियंता आणि अधीक्षक अभियंता यांच्याकडे पत्र व्यवहार केला आहे मात्र विद्यमान आमदारांनी कशाचीही शहानिशा करतात केवळ आमदारांना देण्यात येणाऱ्या बुकलेटमध्ये नावे वाचली आणि मंजुरी मिळाल्या बाबतच्या बातम्या दिल्या आणि जाहिराती प्रसिद्ध करून स्वतःचीच बडवून घेतली वास्तविक पाहता सुधारित वितरण केंद्र योजना (आर डी एस एस ) अंतर्गत आधुनिकीकरण या विभागात नवीन उपकेंद्र क्षमता वाढ या योजनेस केंद्र शासनाची अद्यापही मंजुरी मिळालेली नाही आमदार महोदयांनी १९ जुलै २०२३ रोजी निविदा प्रसिद्ध झालेल्या महावितरण कंपनीने फेज वन ही योजना त्यांनी प्रसिद्ध केलेल्या निविदे मध्ये वाचावी आमदार महोदयांनी धडधडीत चुकीचे स्टेटमेंट केले आहे छत्रपती संभाजी नगर रिजन मधील लातूर अंतर्गत बीड लातूर आणि धाराशिव हे विभाग आहेत त्यामध्ये लातूर धाराशिव सोडता बीड जिल्ह्यातील एकही काम मंजूर नाही त्यामुळे आमदारांनी चुकीची माहिती देऊन जनतेची दिशाभूल आणि फसवेगिरी करू नये त्यांनी गोरगरीब जनतेची माफी मागावी अशी आपली अपेक्षा असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले..

# भगवान शिनगीरे यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

आष्टी तालुक्यातील वटनवाडीचे आदर्श माजी सरपंच,कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा.संचालक,सहकारी सेवा सोसायटीचे चेअरमन तथा विवेकानंद सेवाभावी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते भगवानरावजी शिनगीरे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार दिनांक ४ ऑगस्ट रोजी विविध माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला यानिमित्त राज्याचे माजी महसूल राज्यमंत्री सुरेश अण्णा धस,माजी आमदार साहेबरावजी दरेकर,सागर धस, मेहबूब शेख,जिल्हा परिषद सदस्य माऊली जरांगे,माजी जिल्हा परिषद



सदस्य खंडू जाधव,जामगावचे सरपंच सतीश शेठ धस,कड्याचे माजी सरपंच रामशेठ मधुरकर,आष्टीचे माजी सरपंच नामदेव राऊत,माजी सहकार अधिकारी झांजे सर,किशोर हंबर्डे,भाऊसाहेब भवर,झुंजार नेताचे उपसंपादक उत्तम बोडखे,पुरोगामी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष तथा बीड जिल्हा संपादक अण्णासाहेब साबळे,माजी सरपंच रामदास जाधव,संजय ढोबळे, पोपट घुले,जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के, संस्थाचालक दिलीप वायबसे,वैजिनाथ निर्मळ,भरत मोरे,संजय तांबे,बालाजी मेनकुदळे, हेमंत पोखरना,डॉक्टर महेंद्र पटवा,शेख सर,संजय गाढवे,भागीरथ धारक,सरपंच अशोक मुळे,सरपंच अशोक पोकळे,माजी सरपंच छगन शिनगिरे,माजी सरपंच युवराज तरटे,माजी सरपंच बिट्टू पोकळे,माजी सरपंच संजय पवार,माजी सरपंच संजय पोकळे,माजी सरपंच राम धुमाळ,माजी सरपंच अर्जुन मैंद,माजी सरपंच विठ्ठल राख,अरुण पडोळे,दत्ता हुले, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, पत्रकार शरद तळेकर,पत्रकार समीर शेख,गौतम खंडागळे, मारुती पोकळे,ड विधाते,ड जोशी,ड राहुल धुमाळ,ड संभाजी दहातोंडे,बीड जिल्हा ग्रंथालय संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र सानप,रावसाहेब मुटकुळे,विजय खकाळ,बाळासाहेब खकाळ, उपसरपंच संतोष मुटकुळे,माजी उपसरपंच युवराज मुटकुळे, भास्कर मुटकुळे स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे तालुका अध्यक्ष संतोष जम्पलवार, स्वस्तधान्य दुकानदार बारीकराव भोसले,नवनाथ विधाते, बाबासाहेब शिंदे,मेजर विकास मस्के,अंकुश औटे,सोहनकुमार धार्मिक,बबन लोंढे,विठ्ठल शेलार,विष्णू कराळे,बळीराम शिनगिरे,माऊली शिनगिरे, विठ्ठल काकडे,राजू मुटकुळे भगवानदादा शिनगीरे युवा मंच आष्टी तालुका, जी.एस किरण शिनगीरे मित्रपरिवार आजी–माजी जिल्हा परिषद सदस्य,आजी–माजी पंचायत समिती सदस्य, आजी–माजी संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती कडा, आजी–माजी सहकारी सेवा सोसायटीचे चेअरमन, आजी–माजी सरपंच,मांडवा, वटनवाडी ग्रामस्थासह जवळपास ५००० लोकांनी शुभेच्छा दिल्या.


# ष.ब्र.१०८ श्री गुरूपादेश्वर शिवाचार्य महाराज यांचे द्वादश श्रावणमास तपोनुष्ठानास उत्साहात प्रारंभ

## विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचेही आयोजन भाविकांची मोठी उपस्थिती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे

पवित्र श्रावणमासानिमित्त श्री गुरुपादेश्वर शिवाचार्य महाराज गिरगावकर यांचे आज सोमवार दिनांक ५ ऑगस्टपासून प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या श्री शनी मंदिरात अनुष्ठान सुरू उत्साहात प्रारंभ झाला आहे. यानिमित्ताने अनेक धार्मिक, सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.





श्रावणमास निमित्त गुरूपादेश्वर शिवाचार्य महाराज, गिरगांवकर यांचे ५ ते १७ ऑगस्ट दरम्यान श्री.शनी मंदीर देवस्थान, वैद्यनाथ मंदीरच्या पायथ्याशी श्रावणमास तपोनुष्ठानाचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान आज सकाळी श्री व सौ.सचिन त्रिंबकअप्पा काटकर यांच्या हस्ते श्रीं ची पुजा व आरती करण्यात आली. तसेच महाप्रसाद श्री शाहुराव ढोबळे यांच्या वतीने करण्यात आले.यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत द्वादश पंचम् ज्योतीर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या परळी–वैजनाथ नगरीतील ष.ब्र.१०८ श्री गुरूपादेश्वर शिवाचार्य महाराज यांचे द्वादश श्रावणमास तपोनुष्ठान समितीचे अध्यक्ष चेतन सौंदळे व पदाधिकार्यांच्या हस्ते करण्यात आले.

श्रावणमास तपोनुष्ठान कालावधीत दररोज अन्नप्रसाद, अखंड शिवनाम सप्ताह,परमरहस्य पारायण सोहळा, कीर्तन, प्रवचन, वृक्षदान सोहळा, वृक्षारोपण, जलपुनर्भरण, आरोग्य तपासणी शिबीर, सांस्कृतिक व विविध समाज उपयोगी उपक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे. यावेळी विरशैव लिंगायत समाजाचे समाजबांधव व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# अंबाजोगाई शहरात वृक्षदिंडी,वृक्षारोपण कार्यक्रम

## सिने अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते अंबाजोगाईत वृक्षारोपण





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ व सह्याद्री देवराई यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सुप्रसिद्ध सिनेअभिनेते तथा वृक्षमित्र सयाजी शिंदे यांच्या प्रमुख उपस्थिती आज अंबाजोगाई शहरात भव्य असे वृक्षारोपण व वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले. वृक्षदिंडीची सुरुवात सकाळी रिलायन्स पेट्रोल पंप येथून करण्यात आली. वृक्षदिंडी शहरात फिरून आल्यानंतर दिंडीचा समारोप वेणूताई चव्हाण महिला महाविद्यालयात करण्यात आला. यावेळी अंबाजोगाई शहरातील सर्व शाळा,महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था सहभागी झाल्या होत्या. सुप्रसिद्ध सिनेअभिनेते तथा वृक्षमित्र सयाजी शिंदे यांच्याहस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी मुलांना मार्गदर्शन करण्यात आले असून विद्यार्थ्यांना त्यांच्या हस्ते ४० हजार वृक्ष तथा वृक्षांच्या बिया देण्यात आल्या आहेत.

# ५ वर्षानंतर झोपेतून उठले अन् महाराष्ट्र दौरा सुरू झाला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

५ वर्षानंतर पक्ष झोपेतून उठला आहे, त्यानंतर महाराष्ट्र दौरे चालू लागले, असा खोचक टोला आदित्य ठाकरे यांनी काका राज ठाकरे यांना लगावला.मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र दौऱ्याला सोलापुरातून सुरुवात झाली असून राज ठाकरे यांनी सोलापूर दौऱ्यातूनच आपले विधानसभेचे दोन उमेदवार जाहीर केले आहेत. त्यामुळे, मनसेनं आगामी विधानसभा निवडणुकांसाठी रणशिंग फुंकल्याचं दिसून येत आहे. दुसरीकडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी काका राज यांच्या दौऱ्यावरुन निशाणा साधला.

# जमेल का बघ तुला

लोकनेता न्यूज नेटवर्क


जमेल का बघ तुला
तुझा अहंकार सोडायला
आवडेल का पुन्हा सांग
तोडलेलं नातं जोडायला

जमेल का बघ तुला
मन मोकळे करायला
कायमसाठी माझा
हात हाती धरायला

जमेल का बघ तुला
त्या वळणावरती भेटायला
जिथे प्रेमाची आग दोघांत
लागली होती पेटायला

जमेल का बघ तुला
त्या गुलाबी क्षणांना आठवायला
नकळत एकमेकांना आपण
लागलो प्रेमपत्र पाठवायला

जमेल का बघ तुला
माझ्या केसात गजरा माळायला
पाहून एकटक माझ्याकडे
पुन्हा माझ्यावर भाळायला



रुपाली तुकाराम भोरकडे,
शिक्रापूर, पुणे.

शिक्रापूर : (बबनराव धायतोंडे)

# मातंग समाज एकता मेळावयास हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे

## विलास सुतार तालुका अध्यक्ष मातंग संघ सेनगाव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या निमित्ताने सेनगाव येथे व्हि, के मंगल कार्यालयात दिनांक ७ ऑगस्ट बुधवार रोजी सकाळी ११ वाजता सेनगाव तालुक्यातील मातंग समाज बांधवांच्या वतीने भव्य मातंग समाज एकता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्यास साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नातू तथा मातंग समाजाचे आधारस्तंभ सचिन भाऊ साठे यांची प्रमुख मार्गदर्शन म्हणून उपस्थिती लाभणार असून या एकता मेळाव्यास जिल्ह्यातील हाजारोच्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित रहावे असे आव्हान विलास सुतार तालुका अध्यक्ष मातंग सेनगाव यांनी केले आहे, या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून हिंगोली लोकसभेचे खासदार नागेश पाटील अष्टीकर तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून हिंगोली विधानसभेचे खासदार तानाजीराव मुटकुळे स्वागत अध्यक्ष म्हणून संदेश देशमुख शिवसेना ( ठाकरे गट) अतिथी म्हणून माझी आ भाऊराव पाटील गोरेगावकर,आ प्रज्ञाताई सातव आ रामराव वडकुते, माजी सभापती रूपाली ताई पाटील



गोरेगावकर, विनायकराव भिसे पाटील, दिलीपराव चव्हाण, लोकसभा प्रभारी रामदास पाटील सुमठाणकर, दिनकरराव देशमुख, बाजीराव शिंदे, बिडी बांगर, बंडू कुटे, गोपू पाटील, उमेश देशमुख, पप्पू चव्हाण, हिम्मत राठोड, संतोष देवकर, प्रकाशराव देशमुख, जगदीश देशमुख, प्रवीण महाजन, रवी पाटील, सभापती अशोकराव ठेंगल, विनायकराव देशमुख, संजय देशमुख, परमेश्वर इंगोले, उपसभापती मदन इंगोले, रामप्रसाद घुगे, विकास शिंदे, शेतकरी नेते गजानन कावरखे, जितू देशमुख, जगदीश गाढवे आदी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहे,,

# बीड जिल्ह्यात ६ तर राज्यात २०० पेक्षा जास्त जागा लढवणार–प्रा. टी.पी. मुंडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे

शासकीय विश्रामगृह बीड येथे ओबीसी समाजातील प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी व प्रतिष्ठित ज्येष्ठ नागरिकांची बैठक तसेच पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषद तसेच बैठकीचे आयोजन बीड विधानसभा मतदारसंघाचे प्रमुख व लोकप्रिय समाजसेवक नितीन जायभाये यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी पत्रकार बांधवांच्या सोबत झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये ओबीसी बहुजन पार्टी चे ज्येष्ठ नेते प्रा. टी.पी. मुंडे नी पत्रकारांच्या समोर ओबीसी बहुजन पार्टीची भूमिका स्पष्ट केली. यावेळी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे देताना बीड जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाच्या सहाही जागा आणी महाराष्ट्रातील २८८ पैकी २०० पेक्षा जास्त जागा ओबीसी बहुजन पार्टी लढवणार अशी पक्षाने घेतलेली भूमिका स्पष्ट केली. उरलेल्या जागांची चाचपणी व दौरे चालू आहेत हे स्पष्ट केले. सकल ओबीसी समाज आता एकजूट आणि जागृत झाला आहे व ओबीसी समाजाचे सर्वाधिक संख्याबळ लक्षात घेता महाराष्ट्राच्या विधानसभेवर फक्त सकल ओबीसी समाजाचा झेंडा फडकणार व महाराष्ट्र



राज्यामध्ये ओबीसी समाजच सत्तेत येणार असा ठाम विश्वास व्यक्त केला , व महाराष्ट्रामध्ये सकल ओबीसी समाजाची सत्ता आणणार आणि प्राण गेला तरी चालेल पण मागे हटणार नाही,असा निर्धार व्यक्त केला. त्याचबरोबर या देशात आणि महाराष्ट्रामध्ये विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान वाचविणे आणि संविधानाने दिलेल्या ओबीसी समाजाच्या हक्कांचे रक्षण करणे ही काळाची मोठी गरज बनली आहे. हे ही स्पष्ट केले. यावेळी या बैठकीला ड. अनिल बारगजे, डॉ संदीप आंधळे, ओबीसीचे नेते समाजसेवक तथा उद्योजक दिनेश दादा मोंढेकर,पक्षाचे सचिव रफिकभाई कुरेशी , फैयाज सय्यद इक्बाल भाई सर्व पदाधिकारी प्रमुख कार्यकर्ते आणि जेष्ठ नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# पत्रकार सचिन पवार यांच्यावर वाढदिवसा निमित्त शुभेच्छांचा वर्षाव

## खा.बजरंग सोनवणे, आजी-माजी आमदार, सामाजिक कार्यकर्ते, नेते मंडळी, मित्र परिवाराकडून भरभरून शुभेच्छा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

अगदी अल्पावधी मध्ये आपल्या लेखणीतून सामाजिक कार्यातून वकृत्वातून सर्वांनाच भुरळ पाडणारे पत्रकार सचिन पवार यांचा ०३ ऑगस्ट रोजी वाढदिवस संपन्न झाला. वाढदिवसाच्या निमित्ताने बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार बजरंग बप्पा सोनवणे, आजी-माजी आमदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, ग्राम पंचायत सदस्य, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, यांच्या सह अनेक नेते मंडळींनी शुभेच्छांचा वर्षाव केला. पत्रकार सचिन पवार यांच्या कार्याचे कौतुक सर्व स्तरातून नेहमीच होत आले आहे. पत्रकारितेतून भ्रष्ट नेते, अधिकाऱ्यांना घाम फोडणारे, सर्वसामान्यांना न्याय मिळवून देणारे, सामाजिक कार्यकर्त्यांना ऊर्जा देणारे आणि सर्वांच्याच हक्काचे पत्रकार म्हणून सचिन पवार यांची ओळख आहे. त्याच बरोबर सामाजिक कार्यात देखील सर्वात आघाडीवर राहून सर्वसामान्यांना आपलंसं करत काम करणारे सचिन पवार म्हणून त्यांची ओळख आहे. मित्रांना खरा आणि हक्काचा मित्र म्हणून वाटणारे सुद्धा सचिन पवारच आहेत. त्यांच्या वाढदिवसा निमित्त राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक मराठा चळवळ अशा विविध क्षेत्रातून त्यांच्या वर शुभेच्छांचा वर्षाव मोठ्या प्रमाणात झालेला पाहायला मिळाला ही त्यांच्या कामाची पावतीच म्हणावी लागेल. इतकं प्रेम मिळवायला देखील तितकं झिजाव लागतं हेच सचिन पवार यांनी त्यांच्या लोकप्रियतेतून दाखवून दिले आहे. ०३ ऑगस्ट म्हटलं की हक्काच्या पत्रकाराचा वाढदिवस असंच बोललं जातं आणि त्यांच्या वाढदिवसा निमित्त बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार बजरंग बाप्पा सोनवणे, संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचे अगदी जवळचे सहकारी मराठा सेवक किशोर आप्पा पिंगळे, सहकार महर्षी रामकृष्ण बांगर, डी.सी.सी.बँकेच्या संचालिका सौ.सत्यभामाताई बांगर, जिल्हा परिषद सदस्य सतीश आबा शिंदे, राष्ट्रवादी युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, मराठा सेवक अशोक पोकळे, राजमुद्रा जिल्हाध्यक्ष बाळासाहेब लोखंडे, किशोर काकडे, पाटोदा नगर पंचायतचे नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, राजमुद्राचे मार्गदर्शक सुरेश शेळके, मराठा सेवक सुरेंद्र बाबा तिपटे, आर्यन फाउंडेशनचे राम फाळके, सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष दिपक घुमरे, शिरूरचे सहकारी जीवन



कदम, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप, मराठा सेवक बाळासाहेब शिंदे, भारतीय जनता पार्टीचे भाऊसाहेब भवर, संजय शेळके सर, संतोष पवार, अखिल भारतीय मराठा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष बन्सी दादा डोके, मराठा सेवक आर.आर.येवले, युवा नेते महेश आजबे, पत्रकार अशोक भवर, अण्णासाहेब लवांडे, सरपंच किशोर जेधे, सरपंच संजय खोटे, अर्जुन आबा पवार, मराठा सेवक गजानन बेद्रे सर, बंधू रंजीत पिंगळे, पाटोदा तालुका शिवसेना प्रमुख मुकुंद शिंदे, विश्वास पवार, बाळासाहेब हुलजुते, अक्षय पवार, दादा पवार, रवि पवार, रामहरी पवार, लहू पवार, वसंत पवार, बालाजी पवार, उमेश पवार, यांच्या सह सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, पत्रकारिता तसेच सर्वच क्षेत्रातील नेते मंडळी, कार्यकर्ते, मित्र परिवाराकडून शुभेच्छांचा वर्षाव झाला आहे.

> **खासदारापासून ते सर्वसामान्यांनी दिल्या शुभेच्छा**
>
> **पत्रकार सचिन पवार यांच्या वाढदिवसा निमित्त खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या पासून ते सर्वसामान्य जनतेने दिल्या शुभेच्छा... ०३ ऑगस्ट रोजी पत्रकार सचिन पवार यांचा वाढदिवस असल्याने सर्वांनाच आपल्या हक्काचे पत्रकार वाटणारे आणि सर्वांच्या हाकेला धावून जाणारे पत्रकार म्हणून सचिन पवार यांची ओळख आज जिल्हाभरामध्ये झाली आहे. कोणी ही आपली एखादी बातमी घेऊन त्यांच्या कडे गेलं की नक्कीच प्रकाशित होते आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ते लिहीतात याचा सर्वसामान्य जनतेला नेत्यांना समाधान आहेच म्हणूनच त्यांच्या वाढदिवसा निमित्त शुभेच्छांचा वर्षाव आपल्याला पाहायला मिळतो.**

# मराठा जातीच्या विकासाबरोबर बहुजन समाजातील छोट्या छोट्या जातींचे जगणे सुकर झाले पाहिजे

## हा मराठा सेवा संघाचा विचार आहे-शिवश्री गंगाधर बनबरे





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आपला भारत देश वगळता जगात कुठेही जाती व्यवस्था नाही.आपल्या देशातील जाती मराठा समाजाने निर्माण केल्या नाहीत.एका विशिष्ट व्यवस्थेने देशातील जाती निर्माण केल्या आहेत.त्यामुळे मराठ्यांसह इतर सर्व जाती मागास राहिल्या.तेव्हा मराठा समाजाबरोबरच इतर छोट्या छोट्या जातींचा विकास घडवून आणणे हा मराठा सेवा संघाचा हेतू आहे.असे प्रतिपादन संभाजी ब्रिगेडचे राज्य प्रवक्ते शिवश्री गंगाधर बनबरे यांनी आष्टी येथे केले.मराठा सेवा संघाच्या वतीने आष्टी येथील राजमाता जिजाऊ विद्यार्थी वस्तीगृहाच्या सभागृहामध्ये पदाधिकारी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.त्यावेळी प्रमुख प्रशिक्षक म्हणून ते बोलत होते.

पुढे बोलताना बनबरे म्हणाले की,मराठा समाजाबद्दल व मराठा सेवा संघाबद्दल चुकीचा नॅरेटिव्ह सेट करण्यासाठी एक विशिष्ट समाज पूर्ण वेळ पूर्वीपासून कार्यरत आहे.मराठा सेवा संघाबद्दल जनतेमध्ये चुकीचे समज पसरविण्याचे काम हा समाज करीत आहे.आजही शासन व प्रशासन एका विशिष्ट समाजाच्या अधिकारांमध्ये आहे. त्यामुळे मराठा समाजावर अन्याय होत आहे.आणि म्हणूनच मराठा समाज एवढ्या मोठ्या संख्येने एकत्र झाला आहे. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून देशाच्या सरन्यायाधीश पदावर एकदाही मराठा समाजाला प्रतिनिधित्व मिळाले नाही.याचा अर्थ काय समजायचा? असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

पुढे ते म्हणाले की मराठा समाज आज मोठ्या चक्रव्यूहात सापडला आहे.गरिबीमुळे मराठा समाजातील युवकांचे विवाह रखडले आहेत.त्यामुळे एक पिढीच बरबाद होत आहे.

महाराष्ट्रातील कुठल्याही जातीच्या व्यक्तीला परराज्यामध्ये मराठी म्हणून संबोधले जाते. पूर्वीचा कुणबी आजचा मराठा आहे .त्यामुळे मनोज जरांगे यांचे आंदोलन योग्य आहे असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.या प्रशिक्षणामध्ये बीड जिल्ह्यातून ७० पदाधिकारी सहभागी झाले होते. मराठा सेवा संघाचे ध्येयधोरणे यावेळी गंगाधर बनबरे यांनी शिबिरार्थींना समजावून सांगितले.आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये इंजि.तानाजी जंजिरे म्हणाले की मराठा समाजाने संघटित राहून आपला विकास साधला पाहिजे.शिक्षण घेऊन संघर्ष केला पाहिजे व खऱ्या अर्थाने शासन व प्रशासनावर पकड मिळवली पाहिजे.

या प्रशिक्षणामध्ये बीड जिल्ह्यातून महेंद्र मोरे,सुवर्णा गिरे, विजय दराडे,ड.निर्मलाताई सोनवणे,लक्ष्मण रेडेकर,भास्करराव निंबाळकर, ऍड.सिताराम पोकळे,विद्या चव्हाण,वर्षा शिंदे,माधुरी तवले, संजीवनी टाळके,डॉ.दत्ता नरसाळे,आबासाहेब खिलारे, अनिता निंभोरे,पत्रकार अविशांत कुमकर,बापू जगताप,बन्सीधर मोरे,मुकुंद लगड सर,अविनाश जगताप,सोपान केरळकर यांच्यासह मराठा सेवा संघाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य शशिकांत कण्हेरे यांनी केले.तर आभार प्रदर्शन डॉ.बाबासाहेब मुटकुळे यांनी केले.

# दूध भेसळखोरांवर मोक्का अंतर्गत कारवाई करावी

## भेसळखोरांना गावकऱ्यांनी विषकालवे ही पदवी द्यावी-माजी मंत्री सुरेश धस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

दूध भेसळखोरांच्या विरोधात राज्य सरकारने स्वतंत्र कायदा करावा.किंवा जसं वाळू माफिया आणि गुटखा माफियावर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई चा समावेश केला तसाच दूध माफीया आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्या लोकांच्या विरोधात मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई करावी आणि हा निर्णय आगामी कॅबिनेट किंवा पुढच्या कॅबिनेट मध्येच घेण्यात यावा अशी मागणी मुख्यमंत्री,दोन्ही उपमुख्यमंत्री आणि दुग्धविकास मंत्र्यांना करणार असून अशा भेसळखोरांना आता गावकऱ्यांनी विष कालवे कालवे ही पदवी बहाल करावी असा उपरोधिक टोला माजी मंत्री सुरेश धस यांनी
लगावला ते पत्रकार परिषदेमध्ये बोलत होते
पुढे बोलताना धस म्हणाले की,रविवारी कडा परिसरात झालेल्या भेसळखोरांवर कडक कारवाई व्हावी यासह मुख्य आरोपी असलेल्या व्यक्ती कडून जे जे म्हणून लोक यात सहभागी आहेत त्यांना सह आरोपी करावे.मुख्य आरोपीचे मोबाईल कॉल रेकॉर्ड याचे डिटेल्स चेक करून ज्यांनी ज्यांनी यांच्याकडून हा माल नेलेला आहे अशांवर देखील कडक कारवाई करावी.संबंधित भेसळखोराकडे कोट्यवधीची मालमत्ता कुठून आली ? याचाही शोध घ्यावा.शिवाय या लोकांना मोक्का कायद्यांतर्गत



गुन्हा दाखल झाल्यास चाप बसेल जेणेकरून असले प्रकार राज्यातील थांबतील. आणि राज्य सरकारला ५ रुपये अनुदान देखील देण्याची आवश्यकता लागणार नाही.आणि शेतकऱ्यांच्या दुधाला देखील ४० रुपये लिटर दर मिळू शकेल याबाबत राज्य सरकारने सर्व्हे करावा.संपूर्ण राज्यातील दूध देणारी जनावरे यांची संख्या किती ?कोणत्या गावचे किती लिटर दूध आहे ? याचा सर्व्हे राज्य सरकारने करावा जेणेकरून यातून खरी माहिती पटलावर येईल.आणि भेसळखोरांना आळा बसेल असेही सुरेश धस शेवटी म्हणाले.

# एम फिल धारक प्राध्यापकांचे प्रश्न मुख्यमंत्री यांना भेटून प्रश्न मार्गी लागणार - मंत्री ना.संजय बनसोडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत एमफिल पदवी धारक कृती समितीच्या वतीने आपले विविध प्रलंबित प्रश्न शासन स्तरावरून सोडविण्यासाठी संजय बनसोडे मंत्री क्रिडा,युवक कल्याण व बंदरे मंत्री महाराष्ट्र राज्य,मंत्रालय मुंबई यांची दि.४ ऑगस्ट रोज रविवारी भेटीची वेळ घेऊन सेवे अंतर्गत एमफिल पदवी अर्हता धारक करणारे प्राध्यापकाचे विविध प्रश्नांच्या अनुषंगाने परभणी,नांदेड,लातूर जिल्ह्यातील प्राध्यापकांचे शिष्ठमंडळानी जळकोट येथे प्रत्येक्ष भेट घेऊन गेली ३ वर्षापासून महाराष्ट्र राज्य शासनांच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्राध्यापकांचे प्रश्न प्रलंबित ठेवले आहेत,१९९२ पासून २००६ दरम्यानच्या कालावधीत सेवे अंतर्गत एम फिल पदवी अहर्ता धारक करणाऱ्या प्राध्यापकांना सूट देण्यात आली आहे .

त्याचप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली चे तत्कालीन अध्यक्ष भालचंद्र मुणगेकर यांच्या समितीने सेवेअंतर्गत तथा नवनियुक्त प्राध्यापकाना १४ जून २००६ ते १४ जुलै २००९ या कालावधीतील सेवेतील प्राध्यापकांना १४ जून २००६ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नोटिफिकेशन नुसार सूट देण्यात आलेली आहे.त्यांचं प्रमाणे ५ सप्टेंबर २०२२ यू जी सी ने महाराष्ट्र




राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र पाठवून २००६ ते १४ जुलै २००९ या कालावधीत सेवेअंतर्गत तथा नवनियुक्त प्राध्यापक मंडळीना
एम फिल च्या आधारे पदवी स्तरावर तर पीएचडी पदवी प्राप्त प्राध्यापकांना पदयुत्तर पदवी स्तरांवर अध्यापन करणे व पात्रता ग्राह्य धरण्यात आली आहे,मात्र महाराष्ट्र राज्य शासन नवनियुक व सेवेअंतर्गत एम फिल पदवी अहर्ता धारक प्राध्यापका मध्ये मतभेद निर्मान करून एकास एक न्याय तर तीच पदवी प्राप्त दुसऱ्या प्राध्यापकाना लाभापासू वंचित ठेवण्याचे कार्य चालू ठेवले आहेत, या दुजाभाव वृतीमुळे एम फिल अर्हता धारण करणारे प्राध्यापक पदोन्नतीपासून वंचित राहावे लागत आहे .सदरील प्रश्न आम्ही क्रिडा,युवक कल्याण,बंदरे तथा पालकमंत्री परभणी कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे प्रश्न अवगत करून देण्यात आले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सोमवारी सकाळी मंत्रालयात भेटून प्रश्न निकाली काढण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे शिष्ठमंडळास आश्वासन दिले आहे,

या शिष्टमंडळात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत एम फिल कृती समितीचे अध्यक्ष प्रा.डॉ.धनपाल चव्हाण गंगाखेड,प्रा डॉ नामदेव राठोड - जळकोट,प्रा डॉ बालजी राठोड-जळकोट,प्रा डॉ नवनाथ मुसळे-जळकोट,प्रा डॉ नरसिंग कुडकेकर-जळकोटप्रा डॉ.सुनिल अबटवार-कंधार पत्रकार धोंडीबा मुंडे आदी प्राध्यापक मंडळी उपस्थित होते,

# नदीकाठावरील नागरिकांना अति सतर्कतेचा इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात आजपर्यंत ३४३.५ मिलीमीटर पाऊस झाला आहे. शेजारील पुणे व नाशिक जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे पुणे व नाशिक जिल्ह्यातून अहमदनगर मध्ये येणाऱ्या नद्यांच्या व धरणाच्या पाण्यात वाढ होण्याची शक्यता आहे. अहमदनगर जिल्ह्यातून वाहणाऱ्या गोदावरी, भिमा, प्रवरा, कुकडी व गोड नद्यांमध्ये पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला आहे. त्यामुळे या नदीकाठवरील नागरिकांना अति सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नागरिकांनी सुरक्षित स्थलांतर करावे. असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सरासरी पर्जन्याच्या ७६.६६ % (जून ते सप्टेंबर सरासरी पर्जन्याच्या) पर्जन्यमान झालेले आहे. आज दुपारी १२.०० वाजता जिल्ह्यातील गोदावरी नदीत नांदूर मध्यमेश्वर धरणातून ४४ हजार ७६८ क्यूसेक, भिमा नदीत दौंड पूल येथून ७४ हजार ४५६ क्यूसेक, प्रवरा नदीत भंडारदरा धरणातून २७ हजार ११४, निळवंडे धरणातून २१ हजार ८५५, ओझर बंधारा येथून १ हजार ३९२ क्यूसेक पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला आहे . कुकडी नदीत येडगाव धरणातून ७ हजार ५०० क्यूसेक, घोड नदीत घोड धरणात १० हजार क्यूसेक पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला आहे.

पुणे जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला असून खडकवासला व इतर धरणातून विसर्ग सुरू आहे. पुणे जिल्हयात पर्जन्यमान सुरु असून दौंड पुल येथे भिमा नदीच्या विसर्गामध्ये वाढ होत आहे. तरी अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा व कर्जत तालुक्यातील भिमा नदीकाठावरील नागरिकांना अति सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे. नाशिक जिल्ह्यातील अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. या पावसामुळे गोदावरी नदीतील विसर्गामध्ये वाढ होऊ शकते. तरी अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर व नेवासा या तालुक्यातील गोदावरी नदीकाठावरील नागरीकांना सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे.भंडारदरा धरण पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टी झालेली असून प्रवरा नदीच्या विसर्गामध्ये वाढ झालेली आहे. तसेच निळवंडे धरणातून प्रवरा नदीपात्रात विसर्ग सुरु असून संततधार पाऊस वा अतिवृष्टी झाल्यास विसर्गात वाढ होऊ शकते. पर्यायाने ओझर बंधा-यावरुन प्रवरा नदीच्या विसर्गामध्ये वाढ होऊ शकते. तरी अहमदनगर जिल्ह्यातील अकोले, संगमनेर, राहाता, राहुरी, श्रीरामपूर व नेवासा तालुक्यातील प्रवरा नदी काठावरील नागरीकांना सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे. पुणे जिल्हयात सुरु असलेल्या पर्जन्यामुळे येडगाव धरणातून कुकडी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरु आहे. तरी अहमदनगर जिल्हयातील पारनेर तालुक्यातील कुकडी नदी काठावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे. पुणे जिल्हयातील धरणाद्वारे सोडलेल्या विसर्गामुळे घोड धरणाची पाणी पातळी वाढत असून घोड धरणातून घोड नदीत पाण्याचा विसर्ग सुरु आहे. तरी अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुक्यातील घोड नदी काठावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे.नागरिकांनी स्थानिक प्रशासनाद्वारे दिलेल्या सूचनांचे पालन करावे. सखल भागात राहणाऱ्या नागरिकांनी तातडीने सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे. नदी, ओढे व नाल्याकाठच्या नागरिकांनी दक्ष रहावे. पाणीपातळीत वाढ होत असल्यास नागरिकांनी नदीपात्रापासून तसेच ओढे व नाले यापासून दूर रहावे व सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे. नदी अथवा ओढे नाल्यांवरील पुलावरुन पाणी वाहत असल्यास पुल ओलांडू नये. पूर पाहण्यासाठी गर्दी करु नये. जुनाट/ मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारतीमध्ये आश्रय घेऊ नये. अतिवृष्टीमुळे भूस्खलन होण्याची व दरडी कोसळण्याची शक्यता असते.

दैनिक लोकनेता



## जिल्हाधिकारी अभिजीत राऊत साहेब यांच्याकडे धर्माबाद तालुक्यातील

# मयत शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले असून त्यांच्या वारसाना नवीन पीक कर्ज मिळवून द्यावा-गणेश गिरी यांची मागणी

## मयत शेतकऱ्यांच्या वारसांना पीक कर्ज योजनांचा लाभ मिळालाच नाही-नागनाथ माळगे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**




महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नावाने कर्जमाफी योजना जाहीर केली होती योजनेचा अंमलबजावणी करिता ठेवण्यात आलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे तालुक्यातील काही शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफीचा लाभ मिळाला नाही विशेष म्हणजे सुरुवातीलाही प्रकरणे आधार प्रमाणीकरणामुळे अडकली असल्याचे बँकेच्या व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले होते यापैकी अनेकांनी आधार प्रमानीकरण करूनही योजनेचा लाभ मिळत नसल्याने नेमकी आडकाडी का व कशासाठी असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे बँकेच्या कर्तव्यामध्ये कसूर आहे का?नवीन सरकार आले.मुखमंत्री साहेबांनी या विषया कडे लक्ष घालुन मयत शेतकऱ्यांच्या वारसांना न्याय मिळवून द्यावा अशी धर्माबाद तालुक्यातील मयत शेतकऱ्यांच्या वारसांकडून मागणी होतं आहे. मयत शेतकऱ्यांच्या वारसांना न्याय मिळेल का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे तालुक्यातील भारतीय स्टेट बँक शाखा धर्माबाद व शाखा येताळा जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा धर्माबाद व शाखा करखेली, महाराष्ट्र बँक धर्माबाद, शाखा धर्माबाद, शाखा करखेली, महाराष्ट्र बँक धर्माबाद व शाखा धर्माबाद बँक ऑफ बडोदा, करखेली शाखा ,इत्यादी बँकेच्या माध्यमातून ५२ गावातील शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपाची जबाबदारी देण्यात आली तालुक्यात उपरोक्त बँकेच्या वतीने प्रत्येक शाखेतील काही खातेदारांचे त्यांच्या कर्जमाफी योजनेत समावेश झाल्याचा मेसेज आला पण प्रत्यक्षात कर्जमाफी मिळाली नाही किंवा नव्याने पीक कर्ज मिळाले नाही योजना सुरू होऊन देखील पाच वर्ष संपले तरी कर्जमाफीचा लाभ मिळत नसेल तर नेमक्या अडचणी काय ? हे तरी कळवा व मयत शेतकऱ्यांच्या वारसांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे आता राज्यातील सरकारमध्ये बदल झाला असून पूर्वीच्या सरकारने जाहीर केलेल्या या कर्जमाफी योजनेचा लाभ पाच वर्षापासून अनेक लाभार्थ्यांना मिळालाच नाही . मयत शेतकऱ्यांच्या वारसांना न्याय मिळेल का ? सदरील शेतकरी उपरोक्त योजनेचा लाभ घेण्यासाठी वंचित राहिले तर दोष कुणाचा असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित आज घडीला राहिलेला आहे तालुक्यातील कुटुंब प्रमुख असलेल्या शेतकऱ्यांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या वारसा कडून मृत्यू प्रमाणपत्र व आवश्यक ती कागदपत्रे सादर करण्यात आली मात्र अशा या शेतकऱ्यांना अद्यापही पीक कर्ज योजनेचा लाभ मिळाला नाही तसेच नव्याने पीक कर्ज मिळाले नाही तसेच नव्याने पीक कर्ज मिळाले नाही यात नेमकी अडचण काय याची सहानिशा करून शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देत नवीन पीक कर्ज वाटपाचे काम त्वरित करावे. मयत शेतकऱ्यांच्या वारसांना न्याय मिळवून द्यावा धर्माबाद तालुक्यातील मयत शेतकऱ्यांचे वारसदार यानी तहसील कार्यालय व एसडीओ कार्यालय व पोलीस स्टेशन व निबंध कार्यालय व तालुका कृषी कार्यालय येथे निवेदन देण्यात आले होते व उपोषण देखील तहसील कार्यालय येथे नागनाथ पाटील माळगे यानी आमरण उपोषण केले होते . पण आमरण उपोषण बसल्यानंतर तहसीलदार साहेबांनी लवकरात लवकर मयत शेतकऱ्यांच्या वारसांना न्याय मिळवून देण्यात येईल असा पत्र दिल्यानंतर उपोषण उठवण्यात आले पण अद्याप पाच वर्ष होत आहेत तरी पण मयत शेतकऱ्यांच्या वारसांना नवीन पीक कर्ज मिळाले नाही व त्यांना न्याय मिळाला नाही तरी गतिमान शासनाने लवकरात लवकर मयत शेतकऱ्यांचे २०१९ मध्ये महात्मा ज्योतिबा फुले कर्जमुक्ती मध्ये मयत शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले असून शेतकऱ्यांच्या वारसांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत साहेब यांच्याकडे उपजिल्हाप्रमुख गणेश गिरी महाराज व माजी नरसेवक संजय पवार व नागनाथ पाटील मालगे व पांडुरंग पाटील जगदंबे यांच्याकडून निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत साहेब यांच्याकडे मागणी केली आहे.

**❝ मयत शेतकऱ्यांच्या वारसांच्या शासनाने खात्यामध्ये मात्र अद्यापही रक्कम शासनाने जमा न केल्यामुळे जमा न झाल्याने मयत शेतकऱ्यांचे वारसदार आर्थिक दृष्ट्या हैराण झाले आहेत महाविकास आघाडीच्या सरकारने घोषणा करून देखील पाच वर्षे उलटले तरी नवीन सरकारने शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करून मयत शेतकऱ्यांच्या वारसांना न्याय मिळवून द्यावा. धर्माबाद तालुक्यातील मयत शेतकऱ्यांचे २०१९ मध्ये शासनाने महात्मा ज्योतिबा फुले कर्जमुक्ती मध्ये कर्ज माफ केले होते पण अद्याप शासनाने त्यांच्या खात्यामध्ये पैसे जमा न केल्यामुळे जशास तसे त्यांचे कर्ज दाखवत असल्यामुळे त्यांना नवीन पीक कर्ज मिळत नाही तरी शासनाने लवकरात लवकर त्यांच्या खात्यामध्ये पैसे जमा करावे व नवीन पीक कर्ज मिळवून द्यावे अशी मागणी जिल्हाधिकारी अभिजित राऊत साहेब यांच्याकडे उपजिल्हाप्रमुख गणेश गिरी व माजी नगसेवक संजय पवार व नागनाथ पाटिल मालगे व पांडुरंग पाटील जगदंबे आदि धर्माबाद तालुक्यातील मयत शेतकऱ्यांच्या वारसाना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी केली आहे.**

# अखेर दासखेड, कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग सुरू-डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**



पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारतीसाठी २ कोटी ६३ लाख आणि कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारत आणि वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या निवासस्थाना साठी ६ कोटी ३१ लाख रुपये खर्चून सर्व सोयींनी युक्त आरोग्य केंद्र बांधण्यात आली होती. मात्र २ वर्षांपासून बांधकाम पूर्ण झालेले असताना ही शासनाच्या लालफितीत आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याने उद्घाटनाच्या प्रतीक्षेत होते. मात्र पंचक्रोशीतील गोरगरीब, कष्टकरी, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील रूग्णांची हेळसांड होत असुन त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असुन या बाबत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रे तातडीने सुरू करण्यात यावीत या साठी दिनांक १५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन डॉ.सरिता हजारे सहसंचालक आरोग्य सेवा (प्राआकें/ उपकेंद्र/दवाखाने) मुंबई यांनी घेत जिल्हा आरोग्य आधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना दिले होते. त्या अनुषंगाने डॉ.उल्हास गंडाळ यांच्या आदेशाने दासखेड आणि कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आला असुन रूग्णांची गैरसोय दूर झाली असुन रुग्णांना आता पाटोदा येथे उपचारासाठी जाऊन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार नाही.

### अखेर दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सुविधा सुरू

**दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र तब्बल २ कोटी ६३ लाख रूपये खर्चून मुख्य ईमारत सर्व सोयींनी युक्त बांधण्यात आली होती. मात्र २ वर्षांपासून शासनाच्या लालफितीत आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याने उद्घाटनाच्या प्रतीक्षेत होते. संबधित प्रकरणी १५ ऑगस्ट रोजी आंदोलनाचा ईशारा दिल्यानंतर डॉ.सारिका हजारे सहसंचालक आरोग्यसेवा( प्राआकें/ उपकेंद्र/ दवाखाने)मुंबई यांनी निवेदनाची दखल घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्याच्या सुचना दिल्यानंतर डॉ.उल्हास गंडाळ यांच्या आदेशाने दासखेड आणि कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण सेवा सुरू करण्यात आली असुन वैद्यकीय अधिकारी डॉ.शरयु पडोळे कार्यरत असुन रूग्णांना आरोग्य सेवा देत आहेत.**
**डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर (सामाजिक कार्यकर्ते)**


### आवश्यक पदभरती झाली असुन बाह्यरुग्ण विभाग सुरू

**दासखेड आणि कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य सहाय्यकांची दोन पदे भरलेली आहेत. क्लार्क, एएनएम, सफाई कामगार अशा स्वरूपाचा कर्मचारी वर्ग बाह्य स्त्रोताकडुन भरण्यात आलेला असुन दिनांक १ ऑगस्ट पासुन दोन्ही केंद्रातील बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आलेला असुन पुढील सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्यात येतील.**
**डॉ.उल्हास गंडाळ (जिल्हा आरोग्य अधिकारी बीड.)**

### प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू झाल्याने रूग्णांची हेळसांड थांबणार; पिण्याचे पाणी आणि विजेची सोय करावी

**दासखेड येथील भुमिपुत्र कृष्णा जाधव हे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे विश्वासू अधिकारी असुन एकनाथ शिंदे आरोग्यमंत्री असताना कृष्णा जाधव ओ.एस.डी.म्हणून काम पहात होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे दासखेड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात येऊन २ कोटी ६३ लाख खर्चून ईमारत बांधण्यात आली मात्र २ वर्षांपासून आरोग्य सुविधा सुरू नव्हती. आता आरोग्य सुविधा सुरू झाल्याने पंचक्रोशीतील रूग्णांची हेळसांड थांबणार आहे. या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची आणि विजेची सोय नाही तेवढ्या त्रुटी आरोग्य विभागाने दुर करावव्यात... -प्रविण शिंदे (दासखेड )**

# तांबा राजुरी येथे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त वृक्षारोपण व रक्तदान शिबिर संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त वृक्षारोपण व रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली होती. पाटोदा तालुक्यातील तांबा राजुरी येथे देखील वृक्षारोपण व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक - ०१ ऑगस्ट-२०२४ रोजी एक मुल, एक झाड एक व्यक्ती, एक झाड या उक्तीप्रमाणे केशर आंबा कलम रोपांचे जिल्हा परिषद शाळेतील सर्व मुलांना व ग्रामस्थांना वाटप करण्यात आले. प्रतिनिधिक स्वरूपात १० विद्यार्थी व ३० ग्रामस्थ यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रोपांचे वाटप करण्यात आले. नंतर सर्व ग्रामस्थांना प्रत्येकी एक झाड देण्यात आले. झाडांची लागवड व संगोपन कसे करावे या विषयी वॉटर संस्थेचे ईनुस शेख सर यांनी माहिती दिली. तसेच दिनांक ०३ ऑगस्ट-२०२४ रोजी मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा तांबा राजुरी येथे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये सर्व जाती धर्माच्या लोकांनी सहभाग घेतला व आपले रक्तदान केले. तरुणांमध्ये प्रचंड उत्साह होता. या रक्तदान शिबिरामध्ये एकूण ३५ रक्तदात्यांनी आपले रक्तदान केले. विशेष म्हणजे या शिबिरामध्ये जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथील कर्मचारी रहाटे मॅडम यांनी ही रक्तदान केले. मनोज दादा जरांगे पाटील हे नेहमी सांगत असतात की गाव गाड्यातील मराठा समाज, ओबीसी समाज, दलित समाज, सर्व एकजुटीने वागतो, एकमेकांना सहकार्य करतो अगदी त्याच प्रमाणे या रक्तदान शिबिरामध्ये गावातील सर्व जाती धर्मातील युवकांनी आपले रक्तदान केले.

या रक्तदान शिबिरासाठी बीड ब्लड सेंटरचे बिराजदार सर आणि त्यांचे कर्मचारी यांनी सहकार्य केले. उपस्थित सर्व कर्मचारी यांना हरिदास तांबे यांच्या कडून जेवणाची सोय करण्यात आली होती. सर्व रक्तदात्यांना केळी, बिस्किट व ग्लुकोज भागवत तांबे यांच्या कडून वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नागझरी सेवाभावी संस्थेचे लक्ष्मण तांबे सर, एसएससी फाउंडेशन चे अध्यक्ष नवनाथ तांबे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष बबन पवार सर, मराठा समाजसेवक केशव तांबे, गणेश तांबे, ग्राम पंचायत सदस्य, आदी सकल मराठा समाजाचे युवक व ग्रामस्थ यांनी सहकार्य केले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे ३५ तरुणाने रक्तदान करून हे शिबिर यशस्वी केले.

# उदगीर शहरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना एसटी महामंडळाचे पासेस वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**



उदगीर येथील रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रल, शिवाजी महाविद्यालय व एसटी महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी महाविद्यालयामध्ये पात्र विद्यार्थिनींना मोफत पास वाटप करण्यात आले. तसेच उर्वरित विद्यार्थ्यांना ३३% सवलतीमध्ये बसचे पास वाटप करण्यात आले.

उदगीर बसस्थानकाचे बांधकाम व पावसामुळे पाससाठी विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी उदगीर रोटरीने पुढाकार घेवून शहरात हा उपक्रम राबवित आहे. यामुळे समाजातील सर्वस्तरातून कौतुक होत आहे. याप्रसंगी शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद नवले, रोटरीच्या अध्यक्षा सरस्वती चौधरी, उपाध्यक्ष रविंद्र हसरगुंडे, सचिव ज्योती चौधरी प्रोजेक्ट चेअरमन विशाल तोंडचिरकर, एसटी महामंडळाचे डेपो मॅनेजर चिन्मय चिटणीस, प्रा.-डॉ. व्ही.एम. पवार, प्रा. डॉ. उर्मिला सिरशी (स्वामी), प्रा. मंगला विश्वनाथे, व्यंकटराव कणसे, संतोष फुलारी, विशाल जैन, विजयकुमार पारसेवार, बजरंग चंदनशिवे व महामंडळाचे आर.एच. नारंगवाड, एस.बी. पाटील आदी उपस्थित होते.

# शेतीनिष्ट शेतकरी बबन दादा शिंदे यांच्या ड्रॅगन फ्रुट शेतीला तालुका कृषी अधिकारी यांनी दिली भेट



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

चिखली येथे जागृत देवस्थान महालक्ष्मी यात्रेनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समाजसेवक बबन दादा शिंदे यांच्या राजे संभाजी उद्योग समूहाचे भोजनदानाचा मोठा कार्यक्रम संपन्न झाला.यानिमित्ताने आष्टी तालुक्यातील चिखली येथील शेतीनिष्ट शेतकरी 'समाजसेवक' बबन दादा शिंदे यांच्या ड्रॅगन फ्रुट शेतीला तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी भेट देऊन फळबागेची पाहणी केली यावेळी युवा नेते राधेश्याम भैय्या धस,राजे संभाजी उद्योग समूहाचे संचालक अमोल राजे शिंदे,महेश हंबर्डे यांच्या आदि विविध क्षेत्रातील मान्यवर,शेतकरी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904